MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२३५ | शनिवार दि.१८ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -235 | SATURDAY DT. 18 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## बीड जिल्ह्यामध्ये दंगल घडण्याच्या अगोदर पंकजा मुंडे धनंजय मुंडे बजरंग सोनवणे अशोक हिंगे कलेक्टर एसपी यांच्या उपस्थितीत एक शांतता कमिटीची बैठक घेणे गरजेचे?

# धनंजय मुंडे पालकमंत्री म्हणून तुम्ही पुढाकार का घेत नाहीत?




बीड जिल्ह्यातील अनेक पक्ष संघटना शांतता कमिटी साठी पुढाकार घेऊन पुढे येऊ शकतात एस पी कलेक्टर यांनी आव्हान करणे गरजेचे? सर्वात मोठी शांतता कमिटीची बैठक बीड जिल्ह्यामध्ये एखाद्या मोठ्या मंगल कार्यालयामध्ये घेणे गरजेचे?

बीडच्या जिल्हाधिकारी दीपाताई मुंडे मुधोळ यांनी तात्काळ शांतता कमिटीची बैठकीसाठी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना आदेशित करावे. जिल्हाधिकारी नेमका कोणाच्या इशारा काम करतात हे बीड जिल्ह्यातील जनतेला पडलेला प्रश्न?

नेमकं या जातीयवादी नेत्यांना मतदान पाहिजे परंतु बीड जिल्ह्यामध्ये शांतता नकोय का जनतेला पडलेला प्रश्न..?

बीड जिल्हा पोलीस दलातील अनेक अधिकारी वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये जातीय तेढ निर्माण झाल्यामुळे दररोज येणाऱ्या फिर्यादीला कंटाळले?



# माथी भडकाविण्याचे पाप कोण करतेय

बीड जिल्ह्यामध्ये सध्याच्या ऐरणीवर आला तो प्रश्न म्हणजे बीड जिल्ह्यामध्ये दुष्काळ असावा निर्माण झालेले पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असेल जनावरांना पिण्याचे पाणी नाही तर यावेळी माता-भगिनींना दोन दोन चार चार किलोमीटर दूरवरून पाणी आणण्याचे काम यावेळी ग्रामीण भागात शहरामध्ये करावा लागत आहेत तर यावेळी मात्र बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे असतील किंवा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे असतील विद्यमान खासदार प्रीतम मुंडे असतील किंवा राष्ट्रवादीचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे असतील किंवा वंचित चे उमेदवार अशोक हिंगे असतील यांना मात्र यावेळी फक्त आणि फक्त बतापुरता बीड जिल्ह्यातील जनतेचा वापर केलेला आहे यांनी बीड जिल्ह्यातील लोकसभेच्या प्रचार दरम्यान या सर्व नेत्यांनी पाण्याचा साधा एक शब्दही न काढता फक्त आम्ही हे केलं आम्ही कट्ट्यावरील रुपयांनी आम्ही हजर कुठे आणले असा आव्हान्यात आला परंतु यावेळी जातीचे विष पेरण्याचा कार्यकर्त्यांना सोबत घेऊन हेच नेते फिरलेले असताना मात्र पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरती हे नेते का बोललेल नाही सध्या त्या राजकीय परिस्थितीमध्ये मात्र जातीचे विष पेरणे हे मात्र एकमेव न्यायला जबाबदार नेते मंडळी आहेत एवढी मात्र गोष्ट सर्व जनतेच्या लक्षात नक्कीच आलेली आहे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आज सुद्धा बीड जिल्ह्यातील लोकांना वेदना व चटके देणारा प्रश्न आहे?

## पंकजाताई प्रीतम ताई धनु भाऊ तुम्ही बहिण भाऊ शांतता कमिटीच्या बैठकीसाठी पुढाकार घ्या?

बीड /जिल्ह्यातील अनेक प्रशासकीय अधिकारी हे नाव न सांगण्याच्या अटीवर सांगत आहेत की हेच नेते ज्यांनी राजकारणासाठी ह्या जातीय विष पेरले तेच नेते आता सध्या शांतता कमिटीची बैठक घेण्यासाठी व स्वतःच्या पदरात श्रेय पाडून घेण्यासाठी धडपड करत आहेत तर काही नेत्यांना असं वाटत आहे की ही जातीय दरी जास्त निर्माण होऊन आम्हाला याचा राजकीय फायदा व्हावा यासाठी सुद्धा काही नेतेमंडळी स्वतःच्या फायदा करण्यासाठी जातीचा विष पेरत असल्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेचे जनतेने शांत रहावे असे आव्हान यावेळी सायन दैनिक महाराष्ट्र आरंभ वतीने करण्यात येत आहे.

जेणेकरून वेगवेगळ्या जाती धर्मातील भांडण व जातीयवादी लोकांचे षडयंत्र म्हणून पाडण्याची हीच बीड जिल्ह्यातील जनतेला पंकजाताई धनंजय मुंडे प्रीतम मुंडे अशोक हिंगे बजरंग सोनवणे यांच्याकडून अपेक्षा?

आम्ही सर्व जातींना सोबत घेऊन काम करतो पंकजा मुंडे धनंजय मुंडे प्रीतम मुंडे अशोक हिंगे बजरंग सोनवणे यांनी फक्त मतदानापुरतच हे शब्द मर्यादित ठेवले होते का बीडच्या जनतेकडून या लोकसभेतील उमेदवारांना सवाल?

दीड दिवसातून कार्यकर्ते म्हणू लागले नेत्यांना आता या जाती लय माजलेला आहेत त्या जाती लय माजलेले आहेत यावर मात्र नेते म्हणतात तू लढ तुला काय करायचे मी तुझ्या पाठीशी आहे परंतु जेव्हा गुन्हा दाखल होतो तेव्हा मात्र नक्कीच हा नेता त्या कार्यकर्त्याच्या पाठीशी उभा राहत नाही तर अंधारामधून काढा करण्यामध्ये तो नेता व्यस्त असतो अशीही चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे वेगवेगळ्या जाती धर्मातील लोक मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न असेल किंवा मागासवर्गीय समाजाच्या वेगवेगळ्या मागण्याचा प्रश्न असेल ओबीसी च्या आरक्षणाचा प्रश्न असेल किंवा उमेदवाराचा प्रश्न असेल यावेळी मात्र नेत्यांनी फक्त आणि फक्त जातीवादी राजकारण करत आपण या जातीची छोटे आहोत आपण मोठे आहोत तर या जातीमध्ये एवढं मतदान आहे त्या जातीमध्ये तेवढे मतदान आहे असाही सवाल यावेळी याच उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या कानामध्ये कानमंत्र देऊन सांगितलं असल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये जोर धरू लागली आहे?

बीड जिल्ह्यात दंगल घडण्याच्या अगोदर बीड जिल्ह्याच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी तसेच पालकमंत्री म्हणून धनंजय मुंडे यांनी वंचित चे उमेदवार अशोक हिंगे यांच्यासह बीड लोकसभेमध्ये अनेक उमेदवार उभे होते हे सर्व मतदानासाठी आपापल्या जातीच्या आधारावरती व जातीचा सलोखा राखण्याच्या सभेत भाषा करत यांनी सर्वांनी फक्त मतदारांना यावेळी फक्त आणि फक्त मतासाठीच आवाज दिला आहे यावेळी यावेळी यावेळी आपल्या नेत्यासाठी सर्व जाती धर्माचे कार्यकर्ते ज्या त्या जातीसाठी लढण्याची लढाई या बीड लोकसभेमध्ये पाहायला मिळाली परंतु वंजारी असेल किंवा मराठा असेल हा वाद आज सुद्धा एक विकोपाला जाण्याची दाट शक्यता आहे कारण फेसबुकच्या माध्यमातून यावेळी फेसबुक व्हाट्सअप इंस्टाग्राम सोशल मीडियावर आज वेगवेगळ्या आक्रमक पवित्रा घेतलेल्या रिल्स असतील किंवा व्हिडिओ असतील किंवा लिहून टाकलेला पोस्ट असतील यामुळे बीड जिल्ह्याचे जातीय सलोखा धोक्यात आलेला आहे एकमेकांच्या चुका दुकानांमध्ये धावणाऱ्या वेगवेगळ्या जाती धर्मातील बंधू-भगिनी सर्व धर्म समभावाच्या घोषणा देणारे आज एकूण मेराच्या विरोधामध्ये आहेत सख्या भाऊ पक्का वैरी झाल्यासारखे सध्या बीड जिल्ह्यामध्ये परिस्थिती आहे परंतु यामध्ये बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी सोशल मीडियावरती करडी नजर ठेवत त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे अधिक दिलेले असतानाच यावर वेळी मात्र बीडच्या जिल्हाधिकारी ह्या शांत का आहेत असा प्रश्न यावेळी पडत आहे

बीड जिल्ह्यामधील वेगवेगळ्या जाती धर्मातील सर्वपक्षीय संघटना नेतेमंडळी यांना सर्वांना सोबत घेत बीडचे जिल्हाधिकारी दीपाताई मुंडे मुधोळ व पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी आज सुद्धा सर्वांना शांततेचे आवाहन करणे गरजेचे आहे तर सर्व जाती धर्मातील लोकांना ज्या पद्धतीने पंकजा मुंडे धनंजय मुंडे प्रीतम मुंडे बजरंग सोनवणे तसेच बीड जिल्ह्यातील आजी-माजी आमदार वेगवेगळ्या पक्ष संघटनेचे जिल्हाध्यक्ष सर्वपक्षीय सर्व संघटना नेतेमंडळी सर्व धर्मगुरू सर्वधर्माच्या प्रमुख नेत्यांनी बीड जिल्ह्यामध्ये जातीय सलोखा राखून बीड जिल्ह्यामध्ये दंगल घडण्याच्या अगोदर एक शांतता कमिटीची बैठक घेणे गरजेचे आहे परंतु नेते मंडळी ही बैठक होऊन देत नसल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये प्रशासना स्तरावरून ऐकायला मिळत आहे?

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोंद्रेवस्ती, शाळेचा शंभर टक्के निकाल



सन २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षांमध्ये इंदापूर तालुका प्रज्ञाशोध परीक्षा ही परीक्षा पंचायत समिती इंदापूर मार्फत घेण्यात आली. यासाठी मा. गटविकास अधिकारी व मा.गटशिक्षणाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. इयत्ता तिसरी इयत्ता चौथी या वर्गाचे विद्यार्थी परीक्षेस बसवण्यात आले होते. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोंद्रे वस्ती शाळेची १००% विद्यार्थी पास झाले. तसेच इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी कु.तृप्ती किरण रणवरे हिला ८६% गुण मिळाले. तृप्तीचा इंदापूर तालुका प्रज्ञाशोध परीक्षेत निमसाखर केंद्रामध्ये प्रथम क्रमांक तसेच तालुक्यामध्ये अकरावा क्रमांक आला. यासाठी शाळेतील मुख्याध्यापक श्री बडे सर, व वर्गशिक्षक कुंभार सर यांची मार्गदर्शन तिला लाभले. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सर्व विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करण्यात आले. यासाठी केंद्राचे केंद्रप्रमुख मा.श्री. भिवा हगारे व विस्तार अधिकारी श्री. मुगळे साहेब यांचे मार्गदर्शन लाभले. पालकांनी शाळेच्या, विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला

# प्रसार माध्यमांच्या दणक्याने जाग येताच महावितरणने रोहित्र बसविले

**बीड ।प्रतिनिधी**

**गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथे रोहित्र बसविण्यासाठी गेल्या एक महिन्यापूर्वी पोल उभे करूनही रोहित्र बसवली नाही. यामुळे महावितरणने नागरिकांना वेड्यात काढलं. अशा संदर्भातील वृत्त प्रकाशित होताच याची दखल महावितरणने घेतली आणि लगोलग रोहित्र बसवण्यात आला. याबद्दल महावितरणला धन्यवाद देण्यात येत आहेत.**

माहिती अशी की सदरील भागातल्या लोकांना कमी दाबाने विज पुरवठा होत होता असल्यामुळे लोकांनी आ. लक्ष्मण अण्णा पवार यांना विनंती केली तसे त्यांनी सदरील रोहित्र बसविण्याचे काम करण्याबाबत महावितरणला सुचित केले होते. त्यानुसार महिना भरापूर्वी रोहित्र टाकण्यासाठी खांब देखील उभे केले परंतु रोहित्र टाकलीस नाही महावितरण विभागाचे अधिकारी आणि गुत्तेदार यांनी लोकांना वेड्यात काढून जाणीवपूर्वक त्रास देतात की काय? अधिकाऱ्याच्या दुर्लक्ष मुळे जनतेचे हाल होत आहेत या कडे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देणार का? अशी विचारणा केली जात होती. तसेच तात्काळ रोहित्र बसविण्यात यावे अशी मागणी जनसामान्यातून व नागरिकांतून होत होती. यासंदर्भात माध्यमांनी बातमी प्रसारित केली होती, याचा इफेक्ट म्हणुन शुक्रवार रोजी तात्काळ विलंब करण्यात आलेले रोहीत्र बसविण्यात आले प्रलंबित काम तात्काळ झाल्यामुळे सदरील नागरिकांतून प्रसार माध्यमांचे कौतुक होत आहे.




# समाजात वाचनसंस्कृती रूजविण्याची गरज - लता गुठे

## प्रा.डॉ.महेश खरातांच्या हस्ते काव्य संमेलनचे उद्घाटन

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

टी.व्ही, मोबाईल च्या जमान्यात वाचन संस्कृती लोप पावत चालली असून तिचे पुनरूज्जीवन करण्यासाठी कवी, लेखक, साहित्यिकांना ठोस भुमिका घ्यावी लागेल. मुलांवर चांगले संस्कार करणे ही आई-वडील, शिक्षक आणि लेखकांचीही जबाबदारी आहे असे प्रतिपादन मुंबई येथील सुप्रसिद्ध कवयित्री तथा प्रकाशिका लता गुठे यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा मातृदिन काव्य सप्ताहानिमित्त १५ वे राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्या बोलत होत्या. संभाजीनगर येथील जेष्ठ लेखक प्रा.डॉ.महेश खरात यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

यावेळी एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, एकता फाउंडेशन परभणी जिल्हाध्यक्ष पु.ना.बारडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. एकताचे प्रदेश संघटक देवीदास शिंदे व प्रदेश युवक निमंत्रक इम्रान शेख यांच्या संकल्पनेतून गेल्या चार दिवसांपासून हा उपक्रम सुरू असून दि.१८ मे रोजी त्याची सांगता होणार असल्याचे एकताच्या सल्लागार ड.भाग्यश्री ढाकणे व महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे यांनी सांगितले. काव्य संमेलनाचे प्रस्ताविक उपाध्यक्ष मिरा दगडखैर तर आभारप्रदर्शन उपाध्यक्ष नितीन कैतके यांनी केले.



या काव्य संमेलनात निर्मला शेवाळे (मुंबई), माया दिवाण (बीड), अरूणा दिवेगावकर (लातूर), अलकनंदा घुगे-आंधळे (जालना), प्रा.शंकर राठोड (नांदेड), सुनिता चव्हाण (नांदेड), रामदास घोडके (पैठण) यांनी सहभाग घेतला तर पुणे येथील सुप्रसिद्ध गझलकार बबन धुमाळ यांनी या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन केले.

एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, मुक्त सृजन संभाजीनगर सारख्या संस्थांनी राज्यभरातील लहान मोठ्या कवी लेखकांना एक हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिल्याने अखिल भारतीय स्तरावरील साहित्य संस्थांची मक्तेदारी मोडीत निघाल्याची माहिती काव्य संमेलनाच्या उद्घाटक पदावरून बोलतांना प्रा.डॉ.महेश खरात यांनी उपस्थितांना दिली.

# टाकरवण येथे जल जिवन मिशनची गुत्तेदार डावकरने वाट लावली :- गणेश काजळे

### गांवा सह वस्तीवर अनेक ठिकाणी पाईप लाईन ना दुरूस्थच.?

टाकरवन /प्रतिनिधी

केंद्र सरकारने राज्य सरकारसोबत भागीदारी करत जलजीवन मिशन म्हणजेच हर घर जल ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक घरी पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे हा आहे.मात्र आज घडीला टाकरवण येथील जल जीवनची गुत्तेदार डावकरने वाट लावली आसलेचा आरोप ग्रामपंचायत सदस्य शोभा काजळे यांचा मुलगा गणेश काजळे यांच्या कडुन करण्यात आला आहे कारण जल जिवनचे काम पुर्ण झाले आसल्याचे दाखवले गेले आहे




परंतु प्रत्यक्षात आनेक नागरिकांच्या घरा पर्यत पाणी पोहचे नाही.गुत्तेदार डावकर मुळे या नागरिकाना पाण्या करता धावपळ करावी लागत आसुन वेळ प्रसंगि विकतचे पाणी घ्यावे लागत आहे.

सविस्तर वृत्त असे की माजलगाव तालुक्यातील टाकरवन या ठिकाणी जलजीवन मिशन हे काम चार कोटी साठ लाख रुपयांचे काम मंजूर झाले असून हे काम पूर्ण देखील झाले आहे परंतु आज घडीला पाहिले तर टाकरवण येथील काही वार्डासह वस्तीवरील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गुत्तेदार डावकरणे केलेले काम अनेक ठिकाणी नादुरुस्त असल्यामुळे नागरिकांना पाणी मिळत नसल्याचे समोर येत आहे. टाकरवण येथील सर्व नागरिकांना पाणी कधी मिळणार असा सवाल देखील ग्रामपंचायत सदस्य अशोक खुळे यांनी आमच्या पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला.आज घडली अनेक ठिकाणी पाईप लाईन चालु केली कि पाईप लाईन फुटत आहे.यामुळे गुत्तेदार डावकरने केलेले काम बोगस आसल्याचे समोर येत आहे.

जल जिवन योजनेचे संपुर्ण काम हे जिल्हा परिषद अतर्गत आसुन संपुर्ण काम झाल्या नंतर ते ग्रामपचंयात कडे येईल.सध्या ना दुरूस्थ आसलेले नळ जोडनिचे काम चालु आहे.

वसंत मुने, ग्रामविकास अधिकारी,टाकरवण



# धारूर शहरवासीयांची शिकलकरी कुटुंबांना संसार उपयोगी साहित्याची मदत

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

**बीएसएनएल चा मनोरा पडून नुकसान झालेल्या शिकलकरी समाजातील नऊ आपद्ग्रस्त कुटुंबाना शहवासीयाच्या वतीने आधार म्हणून शुक्रवारी ता. १७ संसार ऊपयोगी भांडीकुंडी देवुन मदत करण्यात आली. मागील आठवड्यात शिकलकरी वस्तीवर दुरसंचारचा मनोरा पडुन झालेल्या दुर्घटनेत नऊ कुटुंबे उघड्यावर आली होती. अशा कुटुंबांना आधार म्हणून संसार उपयोगी साहित्य देण्यात आले,**

**देशातील सर्वात मोठी समजली जाणारी शासनाची दुरसंचार कंपनीचा मनोरा वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे शिकलकरी वस्तीवर पडला. वास्तविक चार वर्षापुर्वी शिकलकरी बांधवानी शासनाला दिलेल्या निवेदनानुसार कार्यवाही केली आसती तर दुर्घटना टळली असती.**

मात्र

शहरवासीयांनी दुर्घटना घडताच ताबडतोब वा-या पावसाची तमा न करता धाव घेवुन जख्मींना शासकिय दवाखान्यात हलवले. त्यासोबत आपदग्रस्तांना नांदेड गुरुद्वारा प्रबंधक समीतीने शिधा व धान्य दिले पण त्यांची अडचण लक्षात घेवुन शहवासीयाच्या लोकसहभागातुन आपदग्रस्त नऊ कुटुबाना प्रत्येकी मोठी स्टिलची बादली, चार ताटे, चार वाट्या, ग्लास, परात, चार कोपरी, जग, चाळणी, पकड, चमचा, उलथणे यासह साहीत्याचे किट करुन मदत दिली. यावेळी संदीप शिनगारे, गौतम शेंडगे, धिरज काळे, अमरसिंह दिख्खत, डॉं. नवनाथ चव्हाण, प्रकाश काळे,नाना चव्हाण, योगेश अंधारे,नाथा चव्हाण, रमेश जाधव, रामेश्वर मनेरी, गणेश ओमनवार, पत्रकार बांधव व नागरीक उपस्थीत होते.

# घाटकोपरच्या दुर्घटनेतुन बीड नगरपालिका बोध घेणार का ??

## न्यायालयाच्या आदेशाचा अवमान,शपथपत्राद्वारे दिशाभूल कि पुन्हा येरे माझ्या मागल्या :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- मुंबईत घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ नागरीकांना जीव गमवावा लागला या दुर्घटनेनंतर बीड शहरातील अनाधिकृत होर्डींगचा मुद्दा चर्चेत आला असुन राज्याच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी व नगरपालिका मुख्याधिका-यांना तातडीने पत्र काढल्यानंतर निता अंधारे बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जाग आली असुन शहरातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेत शहरातील ६ होर्डिंग्ज चालकांना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असुन कारवाईसाठी ८ जणांची नियुक्ती केल्याचे समजते.बीड शहरातील अधिकृत होर्डिंग्जची संख्या ३८ असल्याचा नगरपालिका दावा करत असली तरी प्रत्यक्षात १०० पेक्षा जास्त अनाधिकृत होर्डिंग्ज दिसून येत आहेत.शहरातील ईमारतीवर नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आणि कुठलेही सर्व्हेक्षण न करताच आणि स्ट्रक्चरल आडीट न करताच धोकादायक होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा केवळ २-४ होर्डिंग्ज काढुन कारवाई केल्याचे नाटक नगरपरिषद प्रशासन करत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे त्यामुळे घाटकोपर येथील अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ जण मृत्युमुखी पडलेल्या दुर्घटनेनंतर तरी बीड नगरपरिषद प्रशासन बोध घेईल का?? कि नेहमी प्रमाणेच केवळ कारवाईचे नाटक करते हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल तसेच या होर्डिंग्ज वरील जाहिरातीचा महसूल कोण गोळा करतं? या माध्यमातून शासनाचा महसूल बुडवुन कोणाची तिजोरी भरली जाते हा देखील संशोधनाचा विषय आहे त्यामुळे नगरपालिकेने शहरातील होर्डिंग्ज प्रकरणात सर्व्हेक्षण करून आणि नविन नियमानुसार स्ट्रक्चरल आडीट केल्यानंतरच परवानगी द्यावी आणि दोषींवर कायमस्वरूपी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बीड शहरातील अनधिकृत होर्डिंग्जची ठिकाणे

बीड शहरातील बंजारा हॉटेल, एसपी आफिस समोर,सारडा कपिटल कार्नर ,सेंन्ट अन्स स्कुलसमोर,शिवराज पान सेंटरच्या वर,केएसके कालेज समोर,नगरनाका महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर,बंब सर्कल हिरालाल चौक, अक्षरधाम, बीड पंचायत समिती समोर,बालेपीर, बार्शी नाका चौक,जुने मारूती शोरूम,इंडीयन आईल पेट्रोल पंप बार्शी रोड, मुक्ता लान्स अशा विविध ठिकाणी १०० पेक्षा जास्त ठिकाणी अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत.तसेच बीड शहरातील महत्त्वाचे चौक, दुभाजक याठिकाणी लहानमोठे अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेले असुन ते अपघाताला निमंत्रण देत आहेत.

बेकायदा होर्डिंग्ज,बनर, पोस्टर्स ,कमानी व जाहिराती हटवण्यासाठी काय पावले उचलण्यात आली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह राज्यातील महापालिका आणि नगरषरीषदसह सर्वच नागरी संस्थांना दिलेले आहेत .सन २०१७ च्या निकालात मुंबई उच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की बेकायदेशीर होर्डिंग्ज वर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांविरूद्ध गुन्हेगारी कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय वर्गाच्या सहभागामुळे महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे काम खुप कठीण होताना दिसत आहे.मात्र असे असताना बेकायदेशीर होर्डिंग्ज, बनर,कमानी व अशा प्रकारच्या आकाश चिन्हांच्या माध्यमातून शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे अशी उच्च न्यायालयाची इच्छा असल्याने सन २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील सर्वच नागरी संस्थांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत.ज्यात महापालिका आणि नगरपरीषदांचा समावेश आहे.बेकायदेशीर होर्डिंग्ज,बनर , पोस्टर्स, कमानी काढुन टाकण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा अहवाल सादर करा तसेच बेकायदा होर्डिंग्जची यादी आणि कायदेशीर होर्डिंग्ज मधुन किती महसूल मिळतो याची माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा असे



निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते.न्यायालयाचे आदेश असतानाही संबंधित यंत्रणा अंमलबजावणी करत नसुन कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते.बीड नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी जुन २०२२ मध्ये शपथपत्र दाखल केले होते.मात्र तरीही अद्याप अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.व्यावसायिक जाहिरात दारांनी शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण केले असून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारीनंतर कारवाई तर सोडाच साधे होर्डिंग्ज हटवण्याची तसदी सुद्धा नगरपरिषद प्रशासन घेताना दिसत नाही.

बीड शहरात चमकोगिरी करणारांची मोठ्या प्रमाणावर खोगीरभरती असुन शहरातील मुख्य चौक मुख्य रस्त्यांवरही जयंती,उत्सव ,सण, आंदोलने, वाढदिवस आदी कार्यक्रमांचे सर्रास बनर लावले जातात. तसेच मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्येही बनर उभे केले जातात.अनेकदा हेच बनर हवेने खाली पडुन अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.याचा फटका सर्वसामान्यांना , वाहनधारकांना बसतो.त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो.नगरपालिकेने विशेष मोहीम राबवुन अनाधिकृत बनर लागणार नाहीत याची काळजी घेणं आवश्यक आहे.मात्र नगर पालिका जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

# मराठी शाळांची दुरवस्था थांबणार तरी कधी?

## पटसंख्येअभावी अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर; गुणवत्तेच्या आईचा घो..!

**गेवराई । प्रतिनिधी**

**मराठी शाळांमधील पटसंख्या दिवसेंदिवस घटत चालली असून, हा चिंतनाचा विषय ठरत आहे. एकीकडे मराठी शाळा वाचवण्याचा नारा दिला जातोय, तर दुसरीकडे मराठी शाळेवरील शिक्षकच आपल्या पाल्यांना खाजगी इंग्रजी शाळेत शिकवत असल्याचे दिसत आहे. शिक्षकच आपल्या मुलांना मराठी शाळेत शिकवण्यास धजावत नसल्याने सर्वसामान्य नागरिकही त्यांचेच अनुकरण करीत आपली क्षमता नसतानाही वेळप्रसंगी पदर मोड करीत आपल्या पाल्यांचे मराठी शाळा सोडून इंग्रजी शाळेत प्रवेश घेत आहे. यामुळे मराठी शाळांची परवड होत असून, त्या बंद होण्याच्या मार्गावर येऊन पोहोचल्या आहेत.**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची दयनीय अवस्था झालेली असून, याला शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी राजकीय पुढाऱ्यांच्या दावणीला बांधले असल्यामुळे हा सर्व प्रकार घडवून येत असून, अनेक शाळा ग्रेडचा मुख्याध्यापक नाही तर अनेक शाळांमध्ये नियमबाह्य मुख्याध्यापक खुर्चीवर बसल्यामुळे गुणवत्ता ढासळल्याने जिल्हा परिषद शाळांना वाईट दिवस निर्माण झाल्याने पालकांच्या ओडा जिल्हा परिषद शाळा ऐवजी खाजगी शाळांकडे निर्माण होत आहे. आणि या सर्वांना प्रशासकीय अधिकारी पुढारी व जिल्हा परिषद चे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हात असल्यामुळे जिल्हा परिषद शाळांना वाईट दिवस निर्माण झाले आहेत.

मराठी शाळा वाचविण्यासाठी पालकांनी मुलांना मराठी शाळेत पाठवा असे सांगावे लागते. मराठी शाळांची पटसंख्या वाढेल तर शिक्षकांची नोकरी वाचेल, अशी परिस्थिती असताना मात्र येते असे सांगणाऱ्या शिक्षकांचीच मुले खाजगी शाळेत शिकत आहेत. मग शिक्षक इतर मुलांना मराठी शाळेत दाखल करण्यासाठी कसे बोलणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठी शाळेची ही परवड का होत आहे.



मराठी शाळांवरील शिक्षकच आपल्या मुलांना खाजगी इंग्रजी शाळेत शिकवत असतील तर, इतर पालकांनी कोणत्या विश्वासाने आपल्या मुलांना मराठी शाळेत शिकवावे, असा प्रश्न सर्वसामान्य पालकांना पडत आहे.

गावातील मराठी शाळांनी अनेक पिढ्या समृद्ध केले आहेत. त्यांना उच्च पदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविले आहे. असे असतानाही या शाळांची आज घडीला झालेली दयनीय अवस्थेला आपणही तेवढेच जबाबदार आहोत. हे विसरून चालणार विशेष म्हणजे आज या सरकारी शाळांवर गडांतर आले असतानाही शिक्षण विभागासह कोणालाही त्याचे सोयरसुतक असल्याने वास्तव चित्र गावोगावी दिसून येत आहे. दुसरीकडे सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारावा, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी शासन विविध उपक्रम राबवून लाखो रुपये खर्च करीत असताना बहुतांश शाळेत हे उपक्रम एक फॉर्मेलिटी म्हणून राबविण्यात येत आहेत. ही खरी शोकांतिका आहे. जोपर्यंत ही मानसिकता बदलणार नाही. तोपर्यंत मराठी शाळांचे भवितव्य आणखी आधारमय होत जाईल, हे आजच्या परिस्थितीवरून दिसून येत आहे.

गावोगावच्या मराठी शाळा बंद पडतात, याचे खापर केवळ इंग्रजी माध्यमाकडे मुलांना वळवणाऱ्या पालकांवर पडता येणार नाही. मुळात या पालकांना इंग्रजी माध्यमाकडे का वळवावे वाटते, ती कारणे आधी तपासावी लागतील. मराठी शाळेतील शिक्षकच आपल्या पाल्यांना स्वतः शिकवत असलेल्या शाळेत दाखल करत नसतील, तर इतर पालकांनी कोणत्या विश्वासाने आपल्या पाल्यांना मराठी शाळेत शिकवावे, असा प्रश्न सर्वसामान्य पालकांना पडत आहे. त्यासाठी सर्वप्रथम मराठी शाळांवरील शिक्षकांनी आपण ज्या मराठी शाळांवर नोकरी करून आपला प्रपंच चालवत आहो, याचे भान ठेवून मराठी शाळेत आपल्या पाल्यांना दाखल करून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ज्या गावात आपली नोकरी आहे तिथे राहणेही तेवढेच गरजेचे आहे. तसेच एरव्ही स्वतःला भाषाप्रेमी म्हणवणारे, दुकानाचे नाव मराठी भाषेत हवीत म्हणून भांडणारे आपल्या स्वतःच्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिकवणारे महाभाग आता कालांतराने असे म्हणत आपली जबाबदारी झटकताना दिसत आहेत.

# बुवा जय हरी ! पालखी सोहळ्याचे वेळापत्रक आलं बरं ,लागा तयारीला !

## दोन दिवस पुण्यनगरीत ,सोपान काका जवळ व लोणंदला दोन दिवस माऊलींची विश्रांती !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

वारक-यांचा आत्मा असलेल्या संत ज्ञानोबा तुकोबाचा पालखी सोहळा पंढरीकडे सालाबाद प्रमाणे याही वर्षी लाखो भाविकासमवेत जाणार असुन त्याचा नियमीत आराखडा संस्थानतर्फे जाहिर झाला असुन तमाम वारक-यांना वेध लागले असुन एक दुस-याला जय हरी बुवा पालखी सोहळ्याचे वेळापत्र आले बरं ,तयारीला लागा असे बोलले जात असल्याचे दिसू लागले . वेळापत्रकानूसार माऊलीचा पालखी सोहळा दोन दिवस पुण्य नगरीत तर दोन दोन दिवस सासवडला सोपान काकाजवळ आणि लोणंदला विश्रांती घेणार असल्याचे सांगितले गेले .

माहाराष्ट्रासह कर्नाटक राज्यभरातून देहू आळंदीहून संत ज्ञानोबा ,तुकोबाच्या पालखी सोहळ्यात लाखो भाविक तीन आठवडे उन वारा पाऊस याची पर्वा न करता पायी चालत पंढरीला जात असतो ,शिरूर तालुक्यातूनही हजारो वारकरी या दोन सोहळ्याबरोबर व संत एकनाथ पालखी सोहळ्यात आणि संत भगवानबाबा ,संत वामनभाऊ आदी संता समवेत पायी जात असतात .

पालखी सोहळा महिणा दिडमहिणा आला की वारक-यांना वेध लागतात आणि एक दुस-याला विचारपुस करून लागा तयारीला ,बांधा वळकटी अशी चर्चा करत असतात ,नित्याच्या वारक-याबरोबर नवीन भाविकांना देखील त्या आनंदाची एकदा अनुभूती घ्या असा आग्रही सल्ला देत मानसिक तयारी करून घेत असतात .माऊली पालखी सोहळ्यात तालुक्यातील ज्ञानेश्वर आश्रमाचे महंत नारायण महाराज डीसले हे आपली दिंडी घेऊन सहभागी होत असतात ,पहाता पहाता दिवस जवळ येतील म्हणून आतापासुनच राहुट्या ,गाड्या ,टँकर ,आचारी ,लागणारे किराणा सामान ,धान्य आदीची जमवाजमव सुरू असल्याचे त्यांनी सांगितले .२९ जूनला माऊलीचे प्रस्थान असल्याने तोपर्यंत पाऊस पडून पेरण्या ,कापुस लागवडीचे काम उरकतील आणि दरवर्षीपेक्षा अधिक संखेने वारकरी सोहळ्यात सहभागी होतील.



# अर्धा तालुका पाणीटंचाईने त्रस्त !

## एकसष्ठ हजार नागरीकांची तहाण भागवताहेत ३८ टँकर !

**शिरूर कासार(प्रशांत बाफना)**

**मे महिण्याच्या मध्यावर जवळपास अर्धा तालुका पाणीटंचाईने त्रस्त झाला असुन ६०९४६ नागरीकांची तहान भागवण्याचे काम २० गाव आणि १७ वाड्यावर ३८ टँकरने पाणी पुरवले जात आहे . पावसाळा सुरू होण्याचा जून महिणा आता आणखी पंधरा दिवसांनी सुरू होतोय मात्र या कालावधीत पाणी टंचाईचे ढग कधिक गडद होऊ पहात आहेत .पंचायत समिती व तहसिल कार्यालयाकडे टॅकर मागणी प्रस्ताव सुरूच आहे संयुक्त पहाणी करून गरज लक्षात घेता कार्यवाही अंमलात आणली जाते ,पहिले टॅकर फुलसांगवीत सुरू झाले होते तिथून सुरू झालेला प्रवास आज २० गावात आणि १७ वाड्यावस्त्यावर पोहचला आहे ,अजुनही तो थांबलेला नाही ,प्रशासनासह नागरीकांची ही जल परिक्षाच आहे .**

३८ टँकरच्या ८४ खेपा मंजूर असुन टँकर भरण्यासाठी अधिग्रहीत विहीरीवर १९ तर त्याशिवाय पाणी भरण्यासाठी ८ असे २७ ईंजिनची व्यवस्था केली असल्याचा माहिती अहवाल सांगतोय .


ही गांवे टँकरवर निर्भर !

फुलसांगवी ,उकिर्डा च. ,खोकरमोह ,हिवरसिंगा ,ब्रम्हनाथ वेळंब ,राक्षसभुवन ,झापेवाडी ,कान्होबाची वाडी ,मानूर ,खांबालिंबा ,वारणी ,घोगस पारगांव ,दहिवंडी ,मलकाची वाडी ,मातोरी ,तागडगांव ,माळेगांव , दगडवाडी ,बारगजवाडी ,लोणी ,राळेसांगवी ,तिंतरवणी ,श्रृंगारवाडी व ढोकवड ही गांवे निर्धारित आहेत .सध्या पाणी टंचाई आहे हे नाकारता येत नाही ,गरजनूसार टँकर मंजूरही केले जातात मात्र अशा टंचाईकाळात नागरिकांनी पाणी जपुन वापरून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांनी केले आहे.

# हिंदू-मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

कडा; रहेमान सय्यद

ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव-उरूस गुरूवारी दि.२३ मे पासून मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. आष्टी तालुक्यातील कडा हिंदू -मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे.याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो.कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे.दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यावसाय,नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात.बुध्द पौर्णिमेपासून यात्रेला सुरूवात होते. पौर्णिमेच्या अगोदर येणा-या बुधवारी हजरत मौलाली बाबांना संदल लावतात.यावर्षी गुरूवार दि.२३ मे पासून यात्रोत्सवास सूरूवात होत आहे.सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात.बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा ,गुळ-खोब-याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक-भक्त आपली इच्छापुर्ती करतात.त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते.हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला,पूरूष,



बालगोपाळ देखील सहभागी होतात.तर दुस-या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते.नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विधुत रोषणाईने सजविण्यात येते.यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात.कडयाची यात्रा म्हणजे हिंदू -मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते.हा यात्रोत्सव-उरूस शांततेत साजरा करण्यासाठी ग्रामस्थ,सरपंच,उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, यात्रा कमिटी, पोलिस प्रशासन एकत्रितपणे परिश्रम घेताना पहायला मिळतात.हेच हजरत मौलाली बाबांच्या यात्रेचं वैशिष्ट्य मानलं जातं.

# साकेत इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. कंपनीकडून मजुरांचा जीव गेल्यानंतरच जिल्हाधिकाऱ्यांचे डोळे उघडनार का ?

## मुलभूत हक्क व सुरक्षिततेविना मजुरांकडून काम करून घेणाऱ्या साकेत इन्फ्रा कंपनीवर तातडीने गुन्हा दाखल करा-संभाजी सुर्वे

बीड ।प्रतिनिधी

शिरापूर फाटा ते जरूड फाटा या दरम्यान राष्ट्रीय महामार्गाचे काम चालू आहे. या कामावर शासनाकडून अंदाजे दीडशे कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. मात्र या राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर विविध प्रकारचे मजुर कामाला लावले आहेत. त्यांना कंपनीकडून अथवा मजुर गुत्तेदाराकडून सुरक्षाचे साधने दिले नाहीत. रखरखत्या उन्हात हे मजूर काम करत आहेत, त्याचबरोबर घोडका राजुरी याठिकाणी मोठ्या पुलाचे काम चालू आहे. या पुलावर कसलीही सुरक्षितता, पाळणा, टोपी, बुट, हात मोजेविना हे मजूर उंच असलेल्या पुलावर काम करत आहेत. उष्म घाताने चक्कर आल्यास याला जबाबदार कोण? काम करताना हातात व पायात साधने नसल्यामुळे एखादा मजूर पडल्यास अपंगत्व अथवा जिवीत हानी झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्हाधिकार्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष का केले आहे. जिल्हाधिका-यांच्या कार्यालयासमोर हे मजूर केवळ पायात चप्पल व डोक्यावर काही नसताना तसेच हातात कोणतेही साधन नसताना काम करत आहेत. जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी येता जाता हे पाहत आहेत तरी सुध्या कंपनीला समज दिली नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टी आयटी सेलचे महाराष्ट्र प्रदेश सह संयोजक संभाजी सुर्वे यांनी सामाजिक भान राखून मुख्यमंत्र्यापासून कामगार कार्यालयापर्यंत तक्रार देऊन मजुरांच्या मुलभूत हक्कापासून त्यांच्या सुरक्षितेविना काम करून घेणाऱ्या साकेत इन्फ्रा प्रा.लि. कंपनीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी निवेदनाव्दारे केली आहे.

शासनाकडून एखाद्या कंपनीला रस्त्यासह बांधकाम व इतर कामाचे ज्यावेळेस टेंडर दिले जाते. त्या वेळेस त्या कंपनीचे मजूर व इतर या कंपनीत असणाऱ्या सर्व मनुष्यबळाची जबाबदारी त्याचबरोबर त्यांची सुरक्षितता या संदर्भात जिम्मेदारी घेणे आवश्यक आहे व कंपनीनेही ते देणे कंपनीसाठी चांगली गोष्ट आहे. मात्र बीड तालुक्यातील शिरापूर फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, बार्शी नाका ते जरूड फाटा पासुन पाचशे मीटर पुढे या दरम्यान राष्ट्रीय महामार्गाचे काम चालू आहे.

जेसीबी, पोकलेन, रोड रोलर, त्याच बरोबर वाहन आणि इतर साहित्य दिसून येत आहे. या राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर असलेली मजुरांची संख्या बऱ्यापैकी आहे हे मंजूर कोणत्या राज्यातील आहेत. ते या कामावर आणल्यानंतर त्यांची नोंद संबंधित पोलिस स्टेशन, पोलिस अधिक्षक कार्यालयात केली आहे का? याच बरोबर या मजुरांचा विमा काढलेला आहे का? याची माहिती कंपनीने जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन यांना देण्यात आली आहे का? असा प्रश्न उपस्थित होत असताना सदरील या कामावरील मजुरांकडे पाहिले तर या मजुरांना पायामध्ये चप्पल आहे,





डोक्याला कसलीही इजा होऊ नये म्हणून टोपी नाही. हाताला मार लागू नये यासाठी हातामधील कोणतेही साधने दिसून येत नाहीत.

रखरखत्या उन्हामध्ये उंच ठिकाणी काम करणाऱ्या या मजुरांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गंभीर बाब म्हणजे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंढे हे कार्यालयात येत जात असताना ते मजूर बघत असतात. मात्र त्यांना कोठेही या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी काही दिसून आले की नाही का असा सवाल उपस्थित होत आहे. या कामावर मजुर काम करत असताना उष्माघाताने चक्कर आल्यास कंपनीकडे आरोग्याविषयी काही सुविधा उपलब्ध आहेत का ?त्याचबरोबर सुरक्षितेविना काम करणाऱ्या या मजुरांना काम करत असताना हातापायाला अपंगत्व आले अथवा उंच ठिकाणी काम करत असताना सुरक्षितेविना पडून जिवीत हानी झाली तर याची जबाबदारी कोणाची राहील ? असा प्रश्न भारतीय जनता पार्टी आयटी सेल महाराष्ट्र प्रदेश सह संयोजक संभाजी सुर्वे यांना पडल्यानंतर सामाजिक भान राखून या तरूण समाज सेवकाने पुढाकार घेऊन या विषयी फोटो व माहिती गोळा करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग कार्यालय मुबई, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधिक्षक कार्यालय, बांधकाम कामगार कार्यालय इ आदी ठिकाणी तक्रारीचे निवेदन देऊन मजुरांच्या मुलभूत हक्कापासून आणि सुरक्षिततेविना काम केली आहे.




क्रांतीनगर,आंबेजोगाई, सोहेल शेख यांच्या रिसेप्शन प्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा देताना आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) व इतर मान्यवर...

# आझाद नगरचा अर्धवट सोडलेला बायपास सिमेंटरस्ता तात्काळ सुरू करण्यात यावा

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव शहरातील आझाद नगर येथे होत असलेल्या सिमेंटरस्त्याला नपचे इंजिनीयर व माजी नगरसेवक आळा घालत आहेत. राजकीय सूड भावनेने हा प्रकार केल्या जात आहे.त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांचे अर्धवट झालेल्या रस्त्यामुळे हाल होत आहेत.त्यामुळे हा रस्ता तात्काळ सुरू करण्यात यावा,नसता, आझाद नगरजवळ राष्ट्रीय महामार्गावर दि.२० रोजी रास्ता रोको करन्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला.

माजलगाव नगर परिषदेत भ्रष्ट कारभाराने उच्चांक गाठला आहे. आझाद नगर येथे होत असलेला धारूररोड ते बायपास सिमेंट रस्त्याला नप मुख्याधिकारी, इंजिनियर व येथील एक माजी नगरसेवक राजकीय सुडभावनेने अडथळे आणत आहेत.जाणून बुजून हा रस्ता अर्धवट काम करून सोडला आहे.त्यामुळे रस्त्याविना येथील नागरिकांचे हाल होत आहेत.सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे.त्याचप्रमाणे शहरात झालेले नाली बांधकाम सिमेंट रस्ते पाईपलाईन निकृष्ट,बोगस दर्जाची झाली



सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखाली आझादनगर संघर्ष समितीचे नपला निवेदन

आहेत.या सर्व कामाची कॉलिटी कंट्रोलद्वारे तपासणी करन्यात यावी,त्याचप्रमाणे ओपन स्पेसवरील सर्व अतिक्रमणे काढून शहरातील सर्व डीपी रोड चालू करण्यात यावेत यावेत.तसेच नप मध्ये आलेल्या शासकीय फंडात मोठा भ्रष्टाचार झाला आहे याचीही चौकशी करण्यात यावी.नसता २० मे रोजी आझाद नगरच्या पुलाजवळ राष्ट्रीय महामार्गावर माजी नगरसेवक स.सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. व पुढील आंदोलन विभागीय कार्यालयावर करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने नगरपरिषदेला देण्यात आला आहे.या निवेदनावर स.फारुखअण्णा,मेहबूब चुन्नू, रईसकादरी,शेख सादेक इब्राहिम, समशेरखान साहेबखान पठाण, सत्तारभाई टेलर,सय्यद रहीम फिटर,बाबासाहेब साळवे,सोनबा धिरे,शेख जमील,अतिक अन्सर खान,महेमुब मिरझा बेग,शेख इलियास मासुम,इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

आ.प्रकाश सोळंके यांनी राजकीय सूड भावनेने रस्ता अडवला–सय्यद सलीमबापु.

शहरातील आजाद नगर ही हातावर पोट भरणाऱ्या गोरगरिबांची मोठी वस्ती आहे.ठिकाणी दलित,मुस्लिम मराठा,बहुजन अठरापगड जातीचे लोक राहतात.आ.प्रकाश सोळंके यांना या प्रभागातून मोठा राजकीय विरोध होतो.आशी आकस भावना मनात बाळगून आ.प्रकाश सोळंके या वस्तीकडे पाहत आले आहेत. हा होत असलेला सिमेंट रस्ताही त्यांनी मुख्याधिकारी,इंजिनियर व येथील एका माजी नगरसेवकाला हाताशी धरून राजकीय सूड भावनेने अडवल्याचा आरोप माजी नगरसेवक सय्यद सलीमबापू यांनी आ.सोळंके यांच्यावर

# खोट्या गुन्ह्यांना कंटाळून पेठ बीड पोलिसांच्या विरोधात पत्रकार नविद इनामदार आणि कुटुंबीयांचा आत्मदहनाचा इशारा

## कोणत्याही प्रकारे शाहनिशा न करता पेठ बीड पोलिस ठाण्यात सारखीच गुन्ह्यांची मालिका सुरू

बीड ।प्रतिनिधी

पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते नविद इनामदार यांनी खोट्या गुन्ह्यांना कंटाळून सह कुटुंब आत्मदहन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे पोलिस आयुक्त यांच्या सह पोलिस अधीक्षक आणि पोलिस महा निरीक्षक यांना दिला आहे गेल्या अनेक दिवसांपासून शेख नाजीयां ही महिला आमच्या सह आमच्या कुटुंबातील महिला आणि नातेवकांवर ही विविध खोटे गुन्हे दाखल करत आहे आणि तिच्या सांगण्यावरून पेठ बीड पोलिस कोणत्याही प्रकारची चौकशी अथवा तपास न करताच झटपट गुन्हा दाखल करून मोकळे होत आहेत ही मालिका गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे आता मात्र या सर्व प्रकारामुळे आम्हाला आर्थिक ,मानसिक ,आणि कौटुंबिक त्रास होत आहे या सर्व प्रकाराला आम्ही पुरते वैतागलो असून आता सामूहिक आत्मदहन करण्या व्यतिरिक्त आमच्या कडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही आमच्या वरील गुन्ह्याचा फेर तपास करून ते खोटे गुन्हे रद्द करा नसता आम्ही आत्मदहन करू असा इशारा या निवेदनातून दिलेला आहे.

आम्ही सर्व सर्व साधारण लोक आहोत आमच्या मागील वयक्तिक जीवनात आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही मात्र काही कौटुंबिक कारणामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी शेख नाजीया यांच्याशी थोडे फार किरकोळ वाद झाले होते मात्र त्यांनी काही दिवसांपासून खोट्या तक्रारी करण्याचा जणू सपाटाच लावला असल्याचे दिसत आहे अनेक संबंधित पोलिस ठाणे ही कोणत्याही प्रकारे शहानिशा न करता आमच्यावर गुन्हे दाखल करत असल्याने आता आम्ही याला कंटाळलो आहोत दिनांक १०-५-२०२४ रोजी आम्ही असा कोणताही वाद केला नसताना ही आमच्यावर विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले सध्या खोट्या गुन्ह्यातील नमूद फिर्यादीत सांगितल्याप्रमाणे शेख वाजेद चांद हे १०-५-२०२४ रोजी सकाळी १२ ते १ पर्यंत शहरातील बशीर गंज भागात होते. त्या ठिकाणी विविध सीसीटीव्ही कॅमेरे आहेत यात हे निदर्शनास येईल त्याच प्रकारे शेख नविद शेख चाँद त्या वेळेस पेराडाईज हॉस्पिटल या ठिकाणी एका रुग्णास भेटण्याकरिता गेले असता तरी ही कोणत्याही प्रकारची विचारपूस न करता तपास न करता आमच्यावर विविध कलमानुसार गुन्हा नोंदवण्यात आला, कृपया या सर्व प्रकारचे तपास करून आमच्यावरील खोटे गुन्हे रद्द करण्यात यावे नसता आम्ही सह कुटुंब आत्मदहन करू असे ही निवेदनात म्हटले आहे.

# लोंबकळणाऱ्या तारा व उघडे रोहित्र तात्काळ दुरुस्त करा–ॲड. जोगदंड

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात सदा सर्वदा दुष्काळ पाचवीला पुजलेला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अवकाळी पाऊस तर कधी सुसाट्याचा वारा असे प्रसंग येत असून नैसर्गिक आपत्ती येत आहे. बीड जिल्हा, शहरासह ग्रामीण भागात ठीक ठिकाणी विद्युत पोल वरून तारा लोंबकाळत आहेत तसेच पेठ बीड भागात आदिक प्रमाणात रोहित्र ही उघड्यावर आहेत. त्यांना कसल्याही प्रकारचे संरक्षण कवच नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.



यापूर्वी विद्युत प्रवाहाचा धक्का लागून अनेक जनावरे दगावल्याच्या दुर्दैवी घटना देखील घडलेल्या आहेत. सुसाट वारा व अवकाळी पावसात लोंबकळणाऱ्या तारा मुळे जीवित हानी होऊ शकते अशी शक्यता नाकारता येत नसून तात्काळ विद्युत खांबामधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे तसेच सर्व विद्युत खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करणे, वीज वाहक रोहित्राची तपासणी करून लोंबकळणाऱ्या तारा व उघडे रोहित्र तात्काळ दुरुस्त करून पुढील उद्भवणाऱ्या धोक्यास प्रतिबंध

करण्यात यावा अशी मागणी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांचे सह भाऊसाहेब कदम, सत्यभान जाधव, मंगेश जोगदंड, महादेव वंजारे, लखन जोगदंड राजेश भाई कोकाटे, महेंद्र गायकवाड, चंद्रकांत जोगदंड, सुरज वंजारे, गोरख जोगदंड, लखन शिंदे, नितेश ससाणे, आदर्शराजे जोगदंड, साहिल गायकवाड, अजय जोगदंड, गोरख जोगदंड आदींनी जिल्हाधिकारी व अधिक्षक अभियंता, तसेच कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# बीड लोकसभा निवडणुकीत गुलाल कोण उधळणार..? १९ दिवस वाट बघावी लागणार

**बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजाताई मुंडे की, बजरंग सोनवणे बाजी मारणार? याकडे लागले सर्वांचे लक्ष!**

गेवराई । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात बैठका, मेळावे, पदयात्रा, रॅलीने सर्व कार्यकर्त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून बीड जिल्ह्यातील वातावरण ढवळून निघाले होते. जसाजस मतदानाचा दिवस पुढे येत होता. त्याप्रमाणात धुराळा उडत गेला. सोमवारी बीड जिल्ह्यात उत्साही वातावरणात मतदान पार पडले. त्यासाठी दिसवसभर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात राबत होते. त्यादिवशी मतदानाची वेळ संपल्यानंतर देखील कार्यकर्त्यात मोठा उत्साह जाणवत होता. आता मतदानाच्या आकडेवारीवरून विविध अंदाज बांधले जात आहेत.

बीड मतदारसंघातील लढतीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. या ठिकाणी महायुतीकडून माजी मंत्री पंकज मुंडे या रिंगणात उतरल्या होत्या. तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसने बजरंग सोनावणे यांना निवडणूक रिंगणात उतरवले होते. बीड लोकसभा निवडणुकीत चौथ्या टप्प्यासाठी झालेल्या निवडणुकीत सोमवारी चुरशीने मतदान झाले. याठिकाणी जवळपास ७० टक्के मतदान झाले आहे. त्यामुळे सर्वांनाच निकालाची आतुरता लागली आहे.

बीडमध्ये गुलाल कोण उधळणार हे समजण्यासाठी १९ दिवसांची अद्याप प्रतीक्षा करावी लागणार आहे. निकाल ४ जूनला लागणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यात चर्चेला ऊत आले आहे. निकाल काय असणार याबाबत चौकाचौकात चर्चा सुरु आहेत. त्यासोबतच अनेकांच्या पैजा लागल्या आहेत. त्यामुळे येथील निवडणुकीबाबत उत्सुकता आहे. बीडमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाले आहे. जवळपास ७० टक्के मतदान झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीत लोक मतदानासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडलेले दिसले. त्यामुळे हे वाढलेले मतदान कोणाच्या पथ्यावर पडणार याची जोरात चर्चा सुरु आहे. दुसरी गोष्ट भाजपची यंत्रणा निवडणुकीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात सक्रिय दिसली. त्यामुळे या निवडणुकीत कमळ की तुतारी बाजी मारणार यावर अनेक पैजा लागल्या आहेत.





जिल्ह्यातील मुंडे बंधू-भगिनींचे होम पीच असलेल्या परळी मतदारसंघात जवळपास ८० टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान झाले आहे. या ठिकाणी भाजपची यंत्रणा मोठ्या प्रमाणात कार्यरत होती. याची चर्चा जोरात आहे. त्यामुळे या मतदारसंघातून कमळ की तुतारी बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करावी – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई पाहता टँकर प्रणाली मध्ये तात्काळ सुधारणा करून पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी व सध्याच्या तीव्र पाणी टंचाईवर जिल्हाधिकार्यांनी तातडीने उपाय योजना करावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



बीड जिल्ह्यात सध्या तीव्र पाणी टंचाई सुरु असून शासना मार्फत टंचाई ग्रस्त गावांना टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असून मंजूर टँकरची संख्या व टँकर द्वारे करण्यात येणार्या खेपा यात मोठ्या प्रमाणात तफावत आहे. टँकर मंजूर असलेली संख्या व मंजूर खेपा गाव निहाय टाकण्यात येत नाहीत. जी.पी.एस. प्रणाली टँकरला बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे टँकरचे लोकेशन मिळत नाही. यामुळे पाणी पुरवठा करण्यात मोठ्या प्रमाणात गैर व्यवस्थापन निर्माण झालेले आहे. शासनाची सर्व यंत्रणा हि लोकसभा निवडणूकीत गुंतलेली असल्यामुळे पाणी टंचाई विभागावर दुर्लक्ष होत आहे. यामुळे नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. जनते बरोबरच ग्रामीण भागातील जनावरांनाही मोठ्या प्रमाणात पाणी लागते.

बीड शहरातही मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाल्याने बीड शहरात २० ते २२ दिवसाला पाणी येत असल्याने पाणी वितरण प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक आहे. बीड शहरातील पाणी पुरवठा हा किमान आठ दिवसाला करण्यात यावा. या बाबत नगर परिषद प्रशासनाला तातडीने सूचना देण्यात याव्यात व ग्रामीण भागातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा या बाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. ग्रामीण भागात पाणी टंचाई दुर करण्यासाठी इंधन विहिरी घेणे आवश्यक आहे. परंतु इंधन विहिरींचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. पण वरिष्ठ व कनिष्ठ भुवैज्ञानिक यांच्या जागा रिक्त असल्यामुळे इंधन विहिरींचे सर्वेक्षण होत नाही.

बीड जिल्ह्यातील प्रकल्पातील बुडित क्षेत्रात एम.आर.ई.जी.एस. अंतर्गत पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या करीता तातडीने विहिरी सुरु करण्यात याव्यात या करीता पंचायत समिती प्रशासनाला सुचना देण्यात याव्यात. तरी वरील सर्व बाबीवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# बुद्ध पौर्णिमेच्या दिनी दक्षिण कोरियात साकारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला पुतळा

बीड ।प्रतिनिधी

कोरियन परंपरेप्रमाणे बुद्ध जन्मदिन १५ मे रोजी साजरी करण्यात येतो (कोरियन लुनार कॅलेंडर नुसार) या दिनाचे औचित्य साधून एका ऐतिहासिक घटनेत दक्षिण कोरिया येथील बुद्ध विहारामध्ये डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा पहिला पुतळा अनावरण केला आहे. डॉ.बी.आर.आंबेडकर हे एक प्रसिद्ध भारतीय न्यायविद, अर्थशास्त्रज्ञ आणि समाज सुधारक होते. त्यांनी भारतात बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून येओंगप्योंग, सेऊल येथील नवनिर्मित आणि प्रसिद्ध जेड बुद्ध विहारात हा पुतळा अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. या पुतळा अनावरण सोहळ्यास भारतीय प्रतिनिधीमंडळात लंडन बिझनेस स्कूलचे आयु.नितीन साळवे, नालंदा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, एमएसईबी माजी अधीक्षक अभियंता रवींद्र कोलप, आयु.लक्ष्मण कांबळे (लातूर), माजी नगरसेवक जयकुमार पवार (लातूर), प्रशिक इन्फ्रास्ट्रक्चरचे डायरेक्टर वैभव आदमाने(छत्रपती संभाजीनगर), सेजोंग विद्यापीठातील प्रोफेसर डॉ.पलाश इंगळे,आयु.मनीष वासनिक, कोरिया प्रमुख (एअर इंडिया) मधु वासनिक, दिपाताई रोडे , डॉ.प्रियंका रोडे (बीड) यांचा समावेश होता. अनावरण समारंभाचे नेतृत्व कोरियातील चोंग धाम भंतेजी यांनी केले. दोन्ही कोरियन भंतेनी महा प्रज्ञापारमिता सूत्र आणि बुद्धाच्या आशीर्वादाच्या सूत्रांचे कोरियनमध्ये पठण केले तर डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मुख्य भाषणाचे वाचन नितीन साळवे केले आणि डॉ. जय सुंग सीईओ यांनी अनुवाद केला.दक्षिण कोरियातील सेऊल पासून ३० कि.मी. अंतरावर आहे.

के-पॉप आणि के-ड्रामासारख्या जागतिक सांस्कृतिक निर्यातीसाठी प्रसिद्ध असलेल्या दक्षिण कोरियाने त्यांच्या १७०० वर्षांपूर्वीच्या बौद्ध परंपरांचा आदर केला आहे. ज्याने देशाच्या चारित्र्याला मोठ्या प्रमाणात आकार दिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण हे भारत आणि कोरिया यांच्यातील कायमस्वरूपी सांस्कृतिक आदान-प्रदानाचे प्रतीक आहे. जे बोधिधर्म होएचो आणि महानंद यांच्यासारख्या प्राचीन विद्वानांपासून सुरू झाले आहे.



सांस्कृतिक व लोकशाही समन्वयाचा उत्सव केला उत्साहात साजरी ; डॉ.उपगुप्तो महाथेरो यांनी पुतळा उभारणीसाठी केले विशेष प्रयत्न

पुतळा उभारणीसाठी स्थानिक भारतीय आणि कोरियन समुदायांच्या एकत्रित प्रयत्नांनी आणि दोन्ही बाजूंच्या बौद्ध भिक्षूंनी नेतृत्व केले आहे. जेड बुद्ध विहाराने न केवळ डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारन्यास पुढाकार घेतला तर कोरियातील पाहिले भारतीय बुद्ध विहार आणि आंबेडकर संशोधन केंद्राची स्थापना करण्यासाठी ३५०० स्केअर फुट जमीन दानही करण्याचे ठरविले आहे.

भारतीय बाजूने डॉ. उपगुप्तो महाथेरो यांच्या नेतृत्वाखाली येओंगप्योंग, सिओल येथील जेड बुद्ध विहारात भारतीय बौद्ध विहार उभारण्याची आणि त्याच आकाराची जमीन दक्षिण कोरियातील समकक्षांना अजिंठा लेण्यांजवळ धम्मांचल कोरियन बौद्ध विहार उभारण्यासाठी दान करण्याची प्रतिबद्धता आहे. ज्यामुळे दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध अधिक दृढ होतील.

भारतीय बुद्ध विहाराची स्थापना आणि जमीन दान यांना दोन राष्ट्रांमधील सेतू म्हणून पाहिले जाते जे परस्पर समज आणि सहकार्याला प्रोत्साहन देते. प्रतिसादात्मक हालचालीत, भारतीय बाजूने अजिंठा लेण्यांजवळ एका कोरियन बुद्ध विहारासाठी जमीन दान करण्याचे वचन दिले आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध अधिक मजबूत होतील.

अनावरण सोहळ्याला दोन्ही देशांतील मान्यवर आणि व्यावसायिक नेते उपस्थित होते. ज्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या समाजाला दिलेल्या योगदानाबद्दल चा आदर आणि प्रशंसा प्रतिबिंबित झाली होती.दक्षिण कोरिया येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारणीसाठी लंडन बिझनेस स्कूलचे आयु.नितीन साळवे यांनी अथक परिश्रम घेतले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT